**<u>नवी मुंबई महानगरपालिका</u>**

**महानगरपालिका सचिव कार्यालय, नवीन मुख्यालय, 3रा मजला, बेलापूर, नवी मुंबई 400614.**

**-: <u>सर्वसाधारण सभेची नोटीस</u> :-**

**दिनांक: 10/08/2017.**

नवी मुंबई महानगरपालिकेची **<u>ऑगस्ट महिन्याची सर्वसाधारण सभा, शुक्रवार, दिनांक 18 ऑगस्ट 2017 रोजी सकाळी 11.00 वाजता</u>** बेलापूर, भुखंड क्रमांक 01, सेक्टर 15ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील 5 व्या मजल्यावरील **<u>राजमाता जिजाऊ सभागृह</u>** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल:-

**1.** इतिवृत्त.

**2.** प्रश्नोत्तरे.

**<u>स्थायी समिती मधील ठराव :</u>**

**3.** महापे उड्डानपूल (ठाणे-बेलापूर) पॅनलवरील फलकांवर जाहिरात करण्याबाबतचे हक्क देणे.

**<u>आयुक्तांकडील प्रस्ताव :</u>**

**4.** सार्वजनिक रुग्णालय वाशी से. 10अे, येथे उद्वाहन (20 **passenger cum stretcher lift**) बसविणे.

**5.** नेरुळ से. 19 यशवंतराव चव्हाण मैदान येथे प्रकाश व्यवस्था करणे.

**6.** ठाणे-बेलापूर रस्त्यावर इंडियन ऑइल पेट्रोल पंप (IKEA कंपनी जवळ) ते सविता केमिकल पर्यंत पावसाळी ड्रेन व साईड शोल्डरची सुधारणा करणे.

**7.** ऐरोली विभागातील से.-19 येथील जलउदंचन केंद्रातील जुने पंपरुम व ऑपरेटररूम तोडून नवीन पंपरुम बांधणे तसेच नवीन पंपींग मशिनरी पुरवणे व बसविणे.

**8.** ऐरोली भुखंड क्र. 10 सेक्टर 5 येथील जुने समाजमंदिर तोडून नविन बहुउददेशीय इमारत बांधणे या कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणे.

**9.** नवी मुंबई महानगरपालिकेसाठी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ (MSSC) या शासकिय संस्थेमार्फत सुरक्षा रक्षक उपलब्ध करुन घेणे.

**10.** नेरुळ शिरवणे दत्तकृपा वाडी भागातील गटर व पदपथांची सुधारणा करणे.

**11.** नेरुळ सारसोळे बसडेपो ते गावदेवी चौकापर्यंत रस्ता, गटर व पदपथांची सुधारणा करणे.

**12.** नेरुळ से.-16 येथील गटारांची सुधारणा करणे.

**13.** नेरुळ सारसोळे से.-6 अंतर्गत गटर, रस्ता व पदपथ सुधारणा करणे आणि उर्वरित भागामध्ये जलवाहिनी व मलनि:सारण वाहिने टाकणे.

**14.** नेरुळ से.-16 मध्ये रस्ते, गटर व पदपथ सुधारणा करणे.

**15.** अनाथ मुलीच्या विवाहास/आर्थिक दुर्बल घटकातील विधवा महिलेच्या पुर्नविवाहास अर्थसहाय्य देणे.

**16.** 1 किंवा 2 मुलींवर शस्त्रक्रिया करण्या-या जोडप्यांना प्रोत्साहनात्मक अनुदानाबाबत.

**17.** नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रासाठी लागू असलेल्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 (1) अन्वये फेरबदल करणे.

**18.** नवी मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक रूग्णालय- नेरूळ, ऐरोली व माता बाल रूग्णालय- बेलापूर येथील आंतररूग्णांना भोजन पुरवठा करणे व उपहारगृह चालविणेच्या कामास प्रशासकीय मान्यता मिळणे.

**19.** नवी मुंबई महानगरपालिकेच्या सन 2016-17 या वार्षीक पर्यावरण स्थिती दर्शक अहवालास मंजूरी मिळणे.

**20.** नवी मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकरिता वैद्यकिय अधिकारी/वैद्यकिय तज्ञ यांच्या कंत्राटी (करार) पध्दतीवर तात्पुरत्या स्वरूपात नव्याने नेमणूका करणे.

**21.** सी.बी.डी. बेलापूर से. 15 येथे कोर्ट बिल्डिंग जवळील रस्त्याची व गटाराची सुधारणा करणे.

**22.** वाशी सेक्टर 9ए येथील बसडेपो ते होल्डींग पॉड पर्यंतच्या सायकल ट्रॅकची डांबरीकरणाने सुधारणा करणे.

**23.** कोपरखैरणे सेक्टर 04 येथील चॅनल क्लासिक अपार्टमेंट ते प्राजक्ता सोसायटी व रुम नं. 441 ते रुम नं. 273 पर्यंतच्या स्टॉर्म वॉटर ड्रेनची सुधारणा करणे.

**24.** बेलापूर विभागातील करावे गाव येथील मारुती बाळु तांडेल चौक ते गंगाबाई स्मृती निवास पर्यतच्या पावसाळी गटाराची सुधारणा करणे.

**25.** घणसोली विभागातील ठाणे-बेलापूर रोडलगतच्या शिवाजी फ्लोअर मिल ते पांडुरंग चौक पर्यंतच्या रस्त्याची काँक्रीटीकरणाने सुधारणा करणे.

**26.** घणसोली विभाग कार्यक्षेत्रातील सेक्टर 25 येथील रस्त्यांवर नवीन दिवाबतीची सोय करणे.

**27.** नवी मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागांतर्गत विविध संवर्गातील तात्पुरत्या स्वरूपातील कर्मचाऱ्यांना किमान वेतन अदा करणे.

**28.** नवी मुंबई महानगरपालिकेच्या समाजविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनेबाबत.

**29.** नमुंमपाच्या विविध विभागाच्या दैनंदिन कामाकरिता इंन्टेग्रेटेड इंटरप्राईज सोल्युशन विकसित करणे.

**30.** नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये होणाऱ्या FIFA U-17 वर्ल्ड कप इंडिया 2017 स्पर्धेबाबत.

**<u>ठरावाच्या सूचना :</u>**

**31 ते 33. श्री. आकाश बाळाराम मढवी, यांजकडून :-**

**(31)** "प्रभाग क्र. 14 ऐरोली से. 20, प्लॉट नं. 04 लोटस सोसायटी ते द इंम्पायर सोसायटी व सुल अपार्टमेंट ते यमुना कृपा सोसायटी पर्यंत हेवी डयुटी ड्रेन बनविणे बनविणे. **(32)** "प्रभाग क्र. 14, से. 19 युरो स्कुलच्या बाजुला असलेल्या मोठया नाल्यावर जुन्या ब्रिजच्या बाजुला नवीन ब्रिज बांधणे. **(33)** "प्रभाग क्र. 14 से. 14 लक्ष्मण प्लाझा ते म्हाळसा हाईट्स पर्यंत नवीन मलनि:स्सारण वाहीनी टाकणे.

**34 ते 36. श्री. रविंद्र. उध्दव इथापे, यांजकडून :-**
**(34)** "नवी मुंबईमध्ये ऊन, वारा, आणि, पावसापासून इमारतीचे संरक्षण व्हावे यासाठी शहरातील अनेक सोसायटयांनी इमारतीच्या छतावर गरजेपोटी पावसाळी शेड बांधलेले आहेत. त्यांना महापालिकेने नोटीस बजावलेल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने सिडकोने आणि खाजगी विकासकाने बांधलेल्या निकृष्ट दर्जाच्या इमारती असल्याने त्या मोडकळीस आलेल्या असून पावसाळयामध्ये त्यांचे छत गळते, त्यामुळे बहुतेक सोसायटयांनी पावसाळी पत्र्याचे शेड बांधलेले आहे त्यांना महापालिकेने नोटीस देऊन ते हटविण्यास सांगितले आहे. विकास नियंत्रण नियमावलीत ते बेकायदा ठरतात. परंतु त्याचा व्यवसायिक वापर कोणीही करत नाही. त्यामुळे ती नियमित करावीत व तसा महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत ठराव संमत करणे. **(35)** "प्रभाग क्र. 100 भिमाशंकर सोसायटीच्या पाठीमागील बाजुस उरणफाटा ते पुनीत पार्कच्यामध्ये असलेल्या हायटेन्शनखाली असलेल्या मोकळया जागेचे सपाटीकरण करुन हिरवळ लावून सुशोभिकरण करणे. **(36)** "प्रभाग क्र. 100 भिमाशंकर सोसायटीच्या बाजूला उरणफाटा ते रायन इंटरनॅशनल स्कूल मधील हायटेन्शनखाली असलेल्या मोकळया जागेचे सपाटीकरण करुन हिरवळ लावून सुशोभिकरण करणे.

**37 ते 39. श्री. चेतन प्रकाश नाईक, यांजकडून :-**
**(37)** "प्रभाग क्र. 22 दिवा गाव येथील मुख्य प्रवेशद्वारास कमानी बांधणे. **(38)** "प्रभाग क्र. 22 सेक्टर 08 व 8अ मधील सर्व सिडकोकालीन गटार (यश पॅराडाईज ते श्री जी धाम सोसायटी व अपुर्वा ते गणपती बाप्पा चौक) तोडून नविन आरसीसी गटार बांधणे. **(39)** "प्रभाग क्र. 22, दिवागावात नविन मलनि:स्सारण वाहिन्या टाकणे.

**40. श्री. लिलाधर गणपत नाईक, यांजकडून :-**
"प्रभाग क्र. 50 बोनकोडे मधील सावरीया डेअरी ते उदयान क्र. 9 सी. पर्यंतच्या रस्त्यावर वाहनांची मोठया प्रमाणात ये-जा वाढल्याने रस्त्यावर वारंवार खडडे पडत असतात, त्यामुळे ट्रॅफिक ची समस्या निर्माण होत असते, तरी सदर रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे.

**41 ते 43. श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-**
**(41)** "नवी मुंबई महानगरपालिकेच्या सर्व नगरसेवकांनी आपआपल्या प्रभागात मागील दोन वर्षात सुचविलेल्या विकास कामांचा आढावा घेण्यात यावा व सदर कामे ठरावात मंजूर झाल्याप्रमाणे लवकरात लवकर कामे प्रस्तावित करणे. **(42)** "नवी मुंबई महापालिकांच्या सर्व शाळामधील बंद केलेले संगणक शिक्षण त्वरीत चालु करुन विदयार्थ्यांचे संगणकिय ज्ञान वाढविण्यासाठी भरीव खर्चाची नव्याने तरतुद करणे. **(43)** "ज्या प्रभागात महानगरपालिकेच्या शाळा आहेत मात्र दहावी पर्यंत शिक्षणाची सोय करण्यात यावी त्यासाठी नव्यने लागणाऱ्या वर्गाचे बांधकाम प्रस्तावित करणे.

**44 ते 46. श्रीम.मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-**
**(44)** "प्रभाग क्र. 28 अंतर्गत शंकरबुवा वाडीतील जुनी गटारे तोडून नव्याने हेवी डयुटी गटार बांधणे. **(45)** "प्रभाग क्र. 28 अंतर्गत घणसोली गावात जाण्याच्या रस्त्यावर शंकरबुवा चौकाशेजारी स्पीड ब्रेकर लावणे. **(46)** "प्रभाग क्र. 28 अंतर्गत दत्तनगर येथे अंगणवाडी बांधणे.

**47 व 48. श्री. निवृत्ती शंकर जगताप, यांजकडून :-**

**(47)** "प्रभाग क्र. 29, घणसोली 2 मधील घणसोली सेक्टर 21 येथे “माताबाल रूग्णालय” बांधण्यात यावे. नवी मुंबई महानगरपालिकेचे माताबाल रूग्णालय, नेरूळ, तुर्भे, कोपरखैरणे, ऐरोली येथे कार्यरत आहेत. घणसोली नोडमध्ये “माताबाल रूग्णालय” नाही. घणसोली नोड यात प्रामुख्याने घणसोली गांव, तळवली गाव, गोठवली गाव, राबाडा गाव, तसेच कातकरी पाडा, नौसिल नाका हे भाग येत आहेत. घणसोली सिडको वसाहतीत विकसित होणाऱ्या या नोड मध्ये नागरिकरण मोठ्या प्रमाणात होणार आहे. व म्हणून या ठिकाणी माताबाल रूग्णालय बांधणे अत्यंत गरजेचे आहे. तरी घणसोली नोड करीता प्रभाग क्र. 29 घणसोली 2 मधील सेक्टर 21 येथे “माताबाल रूग्णालय” बांधणे. **(48)** "प्रभाग क्र. 29, घणसोली 2 या प्रभागात म्हात्रे आळी, टेटर आळी, बौध्दवाडी, बाळारामवाडी, महादेववाडी, जयश्रीनगर, तीनबावडी ही नगरे येत आहेत. या ठिकाणी गटर योजना राबवावी. घणसोली गावातील सांडपाण्याची व पावसाळी पाण्याची ही गटारे ग्रामपंचायत असताना बांधली आहेत. आता या सर्व भागात इमारती झाल्या आहेत. ही गटारे तुटली आहेत व अपूरी पडत आहेत. लहान आकाराची गटारे असल्यामुळे सांडपाण्याचा निचरा योग्य प्रकारे होत नाही व पावसाळ्यात ह्या गटारांचा काही उपयोग होत नाही. त्यामुळे काही घरांत पाणी जात आहे व आरोग्याची समस्या निर्माण होत आहे. तरी ही गटारे मोठ्या आकाराची बांधण्यात येण्यासाठी गटार योजना राबविण्यात यावी. अंदाजपत्रक 2017 ते 2018 यात यासाठी तरतूद केली आहे.

**49 व 50. श्री. राजू रामा कांबळे, यांजकडून :-**

**(49)** "प्रभाग क्र. 11, ऐरोलीगाव येथील जुन्या मलनि:स्सारण वाहिन्या बदलणे. **(50)** "प्रभाग क्र. 11, ऐरोलीगाव येथील मोहन मढवी यांच्या घटापासून गावदेवी मैदानापर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे.

**51 व 52. श्रीम. शुभांगी जगदिश गवते, यांजकडून :-**
**(51)** "प्रभाग क्र. 2, मुकूंद कंपनी येथे ईश्वरनगर, रामनगर, गणपतीपाडा विभागासाठी 20 दशलक्ष लीटर क्षमतेची ओव्हरहेड पाण्याची टाकी बांधणे. **(52)** "प्रभाग क्र. 2, ईश्वरनगर येथील सिडको वसाहतीमध्ये मलनि:स्सारण वाहिन्या टाकून सिडकोने सेफ्टी टॅंक साठी राखीव ठेवलेल्या 50 स्क्वेअर मिटर (स्टोरेज टॅंक) भूखंडामध्ये सेफ्टी टॅंक बांधणे.

**53 ते 55. श्री. प्रकाश नानाभाऊ मोरे, यांजकडून :-**
**(53)** "प्रभाग क्र. 58, वाशी सेक्टर 14 ते सतरा प्लाझा मॉल वाशी कोपरखैरणे पामबीच रस्त्यावर स्कायवॉक बांधणे. **(54)** "प्रभाग क्र. 58, महात्मा गांधी कॉम्पलेक्स सेक्टर 14 येथील महापालिकेचा बंद करण्यात आलेल्या जागेवर विरंगुळा केंद्र तसेच तरूणांसाठी व्यायाम शाळा बांधणे. **(55)** "प्रभाग क्र. 58, प्रभागातील सर्व पदपथ सिडकोनिर्मित आहेत. त्यांचे स्लॅब नियमित पडत असतात. तरी सर्व स्लॅब नवीन करून ठिकठिकाणी हेवीड्युटी स्लॅब टाकावेत. तसेच सर्व पदपथ नवीन सुशोभित करणे.

**56 ते 58. श्रीम. प्रज्ञा प्रभाकर भोईर, यांजकडून :-**

**(56)** "प्रभाग क्र. 53, जूहूगांव से.11 येथील शाळा क्र. 29 कै. रामा नामा भोईर न.मुं.म.पा. या शाळेवर एक मजला वाढविणे. **(57)** "प्रभाग क्र. 53, जुहूगांव से.12 येथील संत ज्ञानेश्वर माऊली उद्यानात रहिवासीच्या मागणीनुसार विरंगुळा केंद्र बांधणे. **(58)** "प्रभाग क्र. 53, जुहूगाव से. 11 येथील उर्वरित सिव्हर लाईन टाकणे.

**59 ते 61. श्री. बहादूर त्रिलोकसिंह बिस्ट, यांजकडून :-**

**(59)** "प्रभाग क्र. 08, चिंचपाडा-गवतेवाडी प्रभागात हिंदी भाषिक लोकसंख्या लक्षात ठेवता तेथील गरीब विद्यार्थींना सर्व शिक्षण अभियान शिक्षण मिळण्याकरिता 2 बालवाडी व इयत्ती 1 ली वर्ग सुरू करणे. **(60)** "प्रभाग क्र. 08, चिंचपाडा-गवतेवाडी प्रभागामधील गवतेवाडी भागातील गटार बनवून RCC स्लॅब टाकून व तुटलेले पदपथ व नवीन पदपथ बनवून देणे. **(61)** "नवी मुंबई क्षेत्रातील धार्मिक स्थळ (उदा. मंदिर, मिस्जिद, गिरजाघर व गुरूद्वारा इत्यादी) शिक्षण सथळ (उदा. शाळा कॉलेज, मदरसा इत्यादी)चा 50 मीटरच्या आत असलेले चिकन, मटन, बिफ इत्यादी मास विक्रीचे दुकान हटविण्यात यावे व नवीन परवानगी देण्यात येऊ नये.

**62 ते 64. श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-**

**(62)** "मागासवर्गीय घटका अंतर्गत, अल्पसंख्याक घटकातील इ.1ली ते 10वी, तसेच 10वी ते महाविद्यालयीन शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थींना शैक्षणिक शुल्कासाठी (फि) अर्थसहाय देणे. **(63)** "प्रभाग क्र. 55, खैरणेगांव येथील पादचारी पुलाची सुधारणा करणे. **(64)** "प्रभाग क्र. 55, सेक्टर 11 येथील नागरिकांसाठी वाचनालयची व्यवस्था करणे.

**64 व 65. श्री. रमेश चंद्रकांत डोळे, यांजकडून :-**

**(64)** "प्रभाग क्र. 26, महापे मधील नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. 41 अडवली भुतावली, या शाळेच्या खिडक्यांचे ग्रील गंजलेल्या अवस्थेत असुन ते सैल झाल्याने खिडकीच्या काचा खाली पडतात. ही खुप गंभीर बाब असुन येथील विदयार्थ्यांसाठी धोका निर्माण झाला आहे. तसचे शाळेची रंगरंगोटी व दुरुस्ती न झाल्याने शाळेची दुरावस्था झाली आहे. तरी लवकरात लवकर शाळेची दुरुस्ती व रंगरंगोटी करणे. **(65)** "प्रभाग क्र. 26, महापे मधील अडवली भुतावली गांवातील जुने मोबाईल टॉयलेट आठ वर्षापुर्वी लावण्यात आले आहे. सदर शौचालयाची पुर्णपणे दुरावस्था झाली असून या परिसरातील नागरीकांची गैरसोय झाली आहे. तरी मोबाईल टॉयलेट येथुन हलविण्यात यावे व नवीन पक्के शौचालय बनविणे.

**66 ते 68. श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून :-**

**(66)** "प्रभाग क्र. 97, सेक्टर 24 येथील बामण झोटिंग मैदानाचे सुशोभिकरण करणे. **(67)** "प्रभाग क्र. 97, मधील सेक्टर 18 येथे कै.शहिद तुकाराम ओंबळे इमारत आहे. सदर इमारतीची अवस्था अत्यंत दयनीय झाली असुन, ती केव्हाही पडण्याची शक्यता आहे. तरी त्या ठिकाणी बहुउद्देशिय इमारत बांधणे.

**(68)** "प्रभाग क्र. 97, मधील सेक्टर 18 मधील अनिरुध्द बापु मैदानात व्यासपीठ उभारणे व तेथे दोन छोटया खोल्या बांधण्यात याव्यात जेणे करुन तेथे सांस्कृतिक कार्यक्रम करता येतील (माननीय खासदार श्री. राजनजी विचारे साहेबांनी या कामासाठी त्याच्या खासदार निधीतुन रु.20,0000/- (अक्षरी वीस लाख मात्र) देवु केले आहेत याची कृपया नोंद घ्यावी)

**69 ते 71. श्री. किशोर अशोक पाटकर, यांजकडून :-**

**(69)** "वाशीमध्ये ट्रक टर्मिनल असुन त्याठिकाणी बहुमजली मल्टीलेव्हल व्हॅलेट पार्किंगची सोय करण्यात यावी, तसेच सेक्टर-9 व सेक्टर-17 मध्ये नो पार्किंग झोन जाहिर करावे. **(70)** "महानगरपालिकेच्या ई.टी.सी. विभागात प्रि मॅरेटीअल (Pre-Marital) व पोस्ट मॅरेटीअल (Post-Marital) कौन्सिल चालू करणे. **(71)** "नवी मुंबई महानगरपालिकातील जे मुले-मुली प्रि मॅरेटीअल (Pre-Marital) कौन्सिलींग करून घेतील त्यांनाच महानगरपालिकेने मॅरेज सर्टिफिकेट देणे.

**72 ते 74. श्री. हरिश्चंद्र आत्माराम भोईर, यांजकडून :-**

**(72)** "प्रभाग क्र. 59, से. 11 जुहुगांव येथिल स्वामी नारायण मंदीर ते जुहुगांव स्मशानभुमी पर्यंत वृक्षपटटा (tree belt) विकसीत करणे. सदर ठिकाणी उद्यान विकसीत करुन लहान मुलांसाठी खेळणी घर व जेष्ठ नागरीकांसाठी विरंगुळा केद्र बांधणे. **(73)** "प्रभाग क्र. 59, जुहुगांव सेक्टर 11 वाशी येथील जुहुगांव तलावाजवळील फुटपाथची दुरावस्था झालेली आहे. तसेच तलावाजवळ अंधार असतो. तरी सदर ठिकाणच्या फुटपाथची दुरुस्ती गणेश उत्सवा अगोदर करण्यात यावी व सदर ठिकाणी विदयुत खांब (हायमास्ट) बसविणे. **(74)** "प्रभाग क्र. 59, सेक्टर 11 वाशी येथील वेलकम बुक स्टोअर्स ते कै. राधा सुदाम भोईर निवास बिल्डिंग येथील कमी व्यासाच्या मलनि:स्सारण वाहिनी बदलुन तेथे मोठया व्यासाच्या मलनि:स्सारण वाहिनी टाकणे व तेथील फुटपाथची सुधारणा करणे व तेथे इंटरब्लॉक बसविणे.

**75. श्रीम. संगीता दिलीप बोऱ्हाडे, यांजकडून :-**

"मोरबे धरणातुन आलेल्या पामबीच मार्गावरील जलवाहिनी मधुन सानपाडा सेक्टर-01 पामबीच रेल्वे कारशेड लाईन पर्यंत 600 मीमी ची जल वाहीनी टाकण्यात आली आहे. व सानपाडा सेक्टर -04 येथील जलकुंभा पासुन सेक्टर 08 रेल्वे कारशेड लाईन पर्यंत 250 मी.मी. जलवाहिनी टाकुन झाली आहे. पामबीच से. - 01 येथील 600 मीमी जलवाहिनीतुन रेल्वेच्या लाईन खालून सेक्टर 08 पर्यंत आलेल्या 250 मीमी ही जल वाहीनी जोडण्यात आली तर सानपाडा विभागातील 04 प्रभागातील पाण्याची समस्या कायमस्वरूपी संपेल. सदर जलवाहिनी जोडणे.

**76 व 77. श्री. ममित विजय चौगुले, यांजकडून :-**

**(76)** "प्रभाग क्र. 23, ऐरोली से. 09 व 10 येथील रस्त्यावरील विजेची खांबे L.E.D. दिवे लावून नव्याने दुरूस्त करणे. **(77)** "प्रभाग क्र. 23, ऐरोली से. 09 येथे ह.भ.प. दत्तात्रय महाराज कळंबे चौक येथे रस्ता ओलांडण्यासाठी अपंग नागरीकांसाठी रस्त्यावरील दुभाजकाजवळ रेलींग लावणे.

**78 ते 80. श्रीम. रूपाली किमस्त भगत, यांजकडून :-**
**(78)** "प्रभाग क्र. 96, नेरूळ सेक्टर-16A येथील शाळा क्रमांक 8 व 9 मधील प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे. **(79)** "प्रभाग क्र. 96, नेरूळ सेक्टर-16 येथील छत्रपती संभाजी राजे उद्यानात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे. **(80)** "प्रभाग क्र. 96, नेरूळ सेक्टर-16A, 16 व 18 येथील नादुरूस्त गटारांची पुर्नबांधणी करणे.
**81 ते 83. श्रीम. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-**
**(81)** "प्रभाग क्र.01, ईश्वरनगर येथील संपूर्ण प्रभागातील लाईट पोलवर एल.ई.डी(LED) लाईट बसविणे. **(82)** "नवी मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक शौचालयाकरिता केअर टेकरकडून नागरिकांकडून पैसे घेण्यात येतात ते पैसे नागरिकांकडून न घेता स्वच्छ भारत अभियान अंतर्गत देणे. **(83)**"प्रभाग क्र. 01, ईश्वरनगर येथील ठाणे-बेलापूर मुख्य रस्त्यावरील सिग्नल बंद असतात अनेक वेळा स्कायवॉकची मागणी केलेली असल्याने सदर ठिकाणी अपघात झाल्यास पालिका प्रशासन जबाबदार असेल तरी तेथे रस्ता ओलांडण्याकरिता स्कायवॉक बांधणे.
**84 व 85. श्रीम. सुनिता रतन मांडवे, यांजकडून :-**
**(84)** "अर्थसंकल्पात तरतूद केल्याप्रमाणे छत्रपती शाहू महाराज उद्यानात महाराजांचा नुसता पुतळा न उभारता त्यांच्या जीवनावर आधारित वास्तू उभारणे. **(85)** "नवी मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या परंतु अविकसित स्थितीत असलेल्या सार्वजनिक सेवासुविधा-साठींचे आरक्षित भूखंड, भूभाग हे सामाजिक संस्थांना विविध कार्यक्रमासाठी तात्पुरत्या कालावधीसाठी नाममात्र शुल्क आकारणी करून देण्याची तरतदू करणे.
**86 व 87. श्री. गिरीश कान्हा म्हात्रे, यांजकडून :-**
**(86)** "प्रभाग क्र. 95, नेरूळ मधील अंतर्गत रस्ते आणि मुख्य रस्त्यांची गणेशोत्सवा अगोदर डागडुजी करणे. **(87)** "प्रभाग क्र. 95, नेरूळ मध्ये नव्याने LED फिटींग बसविणे.
**88 व 89. श्री. सुरज बाळाराम पाटील, यांजकडून :-**
**(88)** "भूखंड क्र. 148 आणि 144 से.16अे नेरूळ नवी मुंबई वरील आरक्षण व उद्यान प्रयोजन रद्द करून सदर परिसरात उद्यानाचे प्रयोजनासाठी भू.क्र. 150 व 151 से.16अे, नेरूळ नवी मुंबई राखीव करून तजवीज करणे. **(89)** "नेरूळ, पामबीच (झामा स्विट मार्ट जवळील) सिग्नल येथे भूमीपुत्र कोळी बांधवांना मच्छीमारीकरीता पलीकडे जेट्टीवर जाणेकरीता अंडरपास बांधणे.
**90 ते 92. श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-**
**(90)** "प्रभाग क्र. 12, ऐरोली मधील संपूण स्ट्रीट लाईट व हायमाट हे नेहमी नादुरूस्त असतात ते फार जुने झालेले आहेत. त्यामुळे संपूर्ण परिसरात नवीन पध्दतीप्रमाणे एल.ए.डी लाईट बसविणे. **(91)** "प्रभाग क्र. 12, ऐरोली ज्ञानदिप शाळेजवळील तळमजला + 3 मजली बहुउद्देशीय इमारतमध्ये अद्यावत वाचनालय व स्पर्धा परिक्षा केंद्रासाठी (MPSC व UPSC किंवा अन्य परिक्षेसाठी) संपूर्ण इमारत देणे.
**(92)** "प्रभाग क्र. 12, ऐरोली मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानामध्ये बहुउद्देशीय समाजिक वापरासाठी जागा आहे. ती जागा प्रभागातील मुले व मुलींसाठी व्यायामशाळेसाठी देणे.
**93 ते 95. श्रीम. भारती मंगळ्या कोळी, यांजकडून :-**
**(93)** "प्रभाग क्र. 105 दिवाळे येथे न.मुं.म.पा.मार्फत विद्युत वाहिन्या भूमिगत करण्याचे काम करण्यात आले ते निकृष्ट दर्जाचे केले गेले होते. सदर काम निकृष्ट असल्याने विद्युत वाहिन्या अनेक ठिकाणी खंडीत होत आहेत. तरी सदरचे काम ज्या ठिकाणी समस्या आहेत त्या ठिकाणी काम करणे. **(94)** "प्रभाग क्र. 105 दिवाळे येथील पूर्ण प्रभागातील 6 ठिकाणी बस थांबे आहेत ते नवीन बसविणे. **(95)** "प्रभाग क्र. 105 दिवाळे गावातील संपूर्ण गटर, तसेच पदपथची अवस्था अतिशय खराब झालेली आहे.तरी सदर ठिकाणाचे गटर तसेच पदपथ बांधणे.
**96 व 97. श्रीम. शुभांगी ज्ञानेश्वर पाटील, यांजकडून :-**
**(96)** "नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिसरातील प्रभाग क्र. 67 मध्ये सेक्टर-19अे, तुर्भे, प्लॉट नं.19 व 20 कृष्णा ॲन्ड हरिओम इन्टरप्रायजेस समोरील व परिसरातील गटारे नादुरूस्त आहेत तरी ती नवीन बनवून स्लॅम कॉंक्रीटीकरण करणे. **(97)** "नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिसरातील प्रभाग क्र 67, मधील सेक्टर-20, तुर्भे जवळील गॅस एजन्सीच्या (न.मुं.म.पा. डेपोच्या पाठीमागील) दोन्ही बाजूचे पदपथ खुपच खराब झाल्यामुळे ते नव्याने बनविणे.
**98 व 99. श्रीम. ऋचा रामचंद्र पाटील, यांजकडून :-**
**(98)** "प्रभाग क्र. 79, सानपाडा सेक्टर 10, Shopping Center समोरील जागा जी स्टॉलसाठी राखीव आहे. सदरची जागा सिडकोकडून हस्तांतरीत करून सुशोभिकरण करणे. **(99)** "प्रभाग क्र. 79, सानपाडा येथील बाबू गेनू मैदान सेक्टर 8 सानपाडा येथे व्यासपीठ (योगासने करण्यासाठी) बनविणे.
**100 ते 102. श्री. घन:श्याम रतन मढवी, यांजकडून :-**
**(100)** "पुणे महानगरपालिका ठाणे महानगरपालिका धर्तीवर नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील करदात्यांना प्रॉपटी टॅक्सवरील व्याज माफ करून टॅक्स भरण्यासाठी अभय योजना (Amensty Scheme) लागू करणे. **(101)** "महिला बाल कल्याण विभागातील स्वयंरोजगारासाठी 10 वी पास अट शिथील करणेबाबत व महिला स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण घेण्यासाठी उत्पन्न दाखला अट रद्द करणे. **(102)** "नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात तलावांची संख्या भरपूर असून, दरवर्षी माणसे, मुले बुडून दुर्घटना होत असतात. सदर परिसरात 24 तास कायमस्वरूपी सुरक्षा नेमणे.
**103 व 104. श्रीम. सुजाता सुरज पाटील, यांजकडून :-**
**(103)** "प्रभाग क्र. 85, कुकशेत गाव येथील गावदेवी मैदानाची सुरक्षाभिंत दुरावस्थेत असल्याने त्वरीत सुधारणा करणे. **(104)** "प्रभाग क्र. 85, कुकशेत गावातील पार्किंग समस्या दूर करण्यासाठी भूखंड क्रमांक पी 16 व भूखंड क्रमांक पी 06 येथे तात्पुरत्या स्वरूपाची पार्किंग व्यवस्था करणेकरीता डेब्रिज हटवून कॉंक्रीटीकरण करणे.

**मा. महापौरांच्या आदेशावरून,**

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव,**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक 10 ऑगस्ट 2017.**